# बिबट्यांचा प्रश्‍न : रोगापेक्षा इलाज जालीम

**देशातल्या इतर बऱ्याच गुंतागुंतीच्या प्रश्नांप्रमाणे बिबट्याच्या प्रश्नावरही सहज सापडेल असे उत्तर नाही. गेल्या सहा वर्षांत राज्य आणि केंद्र सरकारांच्या मदतीने या प्रश्नासंबंधी केलेल्या संशोधनात असे दिसून आले, की प्रत्यक्षात प्रश्नावर शोधलेला उपाय प्रश्न जास्त चिघळवत आहे. बिबट्यांचा उपद्रव होणाऱ्या भागात पिंजरे लावून त्रास देणाऱ्या बिबट्याला पकडायचे आणि दूरच्या जंगलात सोडून द्यायचे, हा तो उपाय. खरे तर, या मार्जार कुळातल्या कुठल्याही मोठ्या प्राण्याच्या जगण्यात झालेला मानवी हस्तक्षेप माणसांच्याच जीविताला धोका निर्माण करतो. त्यामुळे परिस्थिती काळजीपूर्वकच हाताळली पाहिजे.**

**- विद्या अत्रेय**

सकाळ : नगर
मंगळवार, १०/११/२००९

या प्रश्नावर सुरू असलेल्या आमच्या अभ्यासातून काही निश्चित बाबी समोर आल्या आहेत. १) महाराष्ट्रात उसाखाली असलेल्या क्षेत्रात कमीत कमी ६०० बिबटे आहेत. (यात जंगले आणि डोंगररांगांच्या प्रदेशाचा अंतर्भाव नाही.) २) बिबट्या मुख्यतः भटकी कुत्री आणि डुकरे यांच्यावर गुजराण करतो. कधी कधी तो शेळी, मेंढी वा वासरू मारण्याचाही प्रयत्न करतो. ३) दिवसभर बिबटे उसाच्या फडात बसून राहतात आणि रात्री बाहेर पडतात. कधी कधी शेतात काम करणारी माणसे, त्यांची लहान मुले अगदी जवळ येऊनसुद्धा बिबटे त्यांना इजा करीत नाहीत.

४) अशा उसात राहणाऱ्या, कुत्र्या- शेळ्यांवर हल्ले करणाऱ्या; पण माणसाला इजा न करणाऱ्या बिबट्याला पकडून जर दूरच्या प्रदेशात सोडले, तर मात्र तो सोडलेल्या भागातल्या माणसांवरही हल्ला करू शकतो. याची कारणे अनेक आहेत, ती म्हणजे : अ) पूर्णतः नवीन प्रदेश असल्याने अन्न कुठे सापडेल याची त्याला काहीच माहिती नसते. ब) आपल्या घरातल्या पाळीव मांजराप्रमाणेच दूर सोडलेला बिबट्या घरी परत जायचा प्रयत्न करतो आणि या प्रयत्नात तो त्या भागातल्या बहुसंख्येने असणाऱ्या माणसांसाठी धोकादायकच ठरू शकतो. क) आपल्याला जर आपल्या घरातून उचलून दूर अनोळखी प्रदेशात नेऊन सोडले, तर जसे आपण तणावग्रस्त होऊ, तसाच हा सोडलेला प्राणीही तणावात आणि भयग्रस्त असतो. भयापोटी अथवा चिडून जर माणसासारखा माणूस अत्यंत अनपेक्षित वागू शकतो, तर मग हा तर बोलून चालून प्राणीच.

५) हल्ल्याचे दोन प्रकार दिसून येतात : अ) अपघाती : जेव्हा बिबट्याच्या पंजाचा फटका माणसाला लागलेला असतो, जेव्हा बिबट्या आणि माणूस अचानक एकमेकांसमोर येतात, तेव्हा असे घडते. माणूस आपल्याला मारेल असे वाटून बिबट्या स्वसंरक्षणार्थ फटका मारून पळून जातो. खरे तर त्याने मारायचेच ठरवले, तर माणसाला मारून टाकायला त्याला मिनिटभरसुद्धा लागत नाही.



**विद्या अत्रेय**

ब) जाणीवपूर्वक : जेव्हा माणूस (बहुधा लहान मूल) मारून, फरफटत नेले जाते किंवा खाल्ले जाते, असा प्राणी अत्यंत धोकादायक असून, तत्काळ हलविण्याची गरज असते. मात्र, हेही लक्षात घेतले पाहिजे, की असा बिबट्या माणसाबद्दल इतका भयशंकित असतो, की त्याला पकडणे कर्मकठीण असते.

६) एखाद्या भागातून जितके जास्त बिबटे काढून टाकले जातील, तितका तो भाग तरुण/लहान बिबट्यांना राहायला घेण्यासाठी रिकामा होत जातो. आईपासून वेगळे होणाऱ्या तरुण बिबट्यांना आपल्या अधिकारांची जागा शोधणे गरजेचे असते. या त्यांच्या आईपासून वेगळे होऊन स्वतंत्र जगण्याच्या काळात जर ते इतर वयस्क बिबट्यांच्या क्षेत्रात घुसले, तर त्यांना पिटाळून लावले जाते किंवा मारून टाकले जाते. ही बहुधा निसर्गाचीच बिबट्यांची संख्या मर्यादित ठेवण्याची योजना.

वयस्क बिबट्यांना आपापल्या भागाची खडान् खडा माहिती असते आणि सहसा ते झगड्यापासून दूर राहतात; पण जर असा एखादा वयस्क, अनुभवी बिबट्या पकडला गेला, तर त्याच्या भागात एक किंवा एकापेक्षा जास्त तरुण अननुभवी बिबटे घुसतात. त्यांना जागा नवीन असल्याने त्यांच्याकडून धोका निर्माण होण्याची शक्यता वाढते. म्हणजेच, माणसावर हल्ला न करता राहणाऱ्या एका वयस्क, अनुभवी बिबट्याला पकडून आपण दोन चुका करत असतो. एक म्हणजे बिबट्यांच्या संख्यावाढीस मदत आणि संघर्षाच्या शक्यतेची वाढ. अमेरिकेतल्या फ्लोरिडा राज्यातल्या बिबट्यांवरच्या संशोधनाचे हे निष्कर्ष आहेत.

७) महाराष्ट्र, गुजरात आणि आफ्रिकेतल्या काही उदाहरणांवरून असे दिसून आले, की शेकडो मैलांचे अंतर कापून बिबटे घरी परततात. यावरून त्यांची मोठ्या अंतराचा प्रवास करण्याची क्षमताही कळून येते.

८) अन्नाच्या उपलब्धतेच्या बाबतीत आपल्या पिकांखालच्या जमिनी बिबट्यांसाठी अनाकर्षक केल्या, तरच माणसांवरचे हल्ले आणि बिबट्यांची संख्या यांच्यात टप्प्याटप्प्याने आणि मोठ्या कालावधीपर्यंत घट होऊ शकेल.

हेच कुत्र्यांबाबतीतही लागू आहे. जर रस्त्यांवर उघड्यावर अन्नपदार्थ फेकले नाहीत, तर कुत्रीही अन्नाच्या शोधार्थ दुसरीकडे जातील आणि मुख्य म्हणजे अन्नाच्या अभावी कमी पिल्ले जगू शकतील.

## तूर्तास एवढे तरी करू या!

**१) लहान मुलांना कधीही एकटे सोडू नका.**
**२) बिबट्याचा माग काढणे, पाठलाग करणे, दगड मारणे, त्याच्या दिशेने इशारा करणे आदी कोणत्याही गोष्टी करू नका. अशाने तुम्ही हल्ला करता आहात असे वाटून बिबट्या इजा करेल.**
**३) दिवसा किंवा रात्री कधीही शेतावर जाताना स्वतःशी गाणे गुणगुणत राहा वा बोलत राहा, ज्यामुळे बिबट्याला तुम्ही कोठे आहात ते कळेल आणि तो तुमच्यापासून दूर राहील.**